# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर
दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६, फॅक्स क्रं.:- ०७१२-२५६१६६३
Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur.dte@gmail.com

**अति महत्वाचे** **क्रमांक :- तंशिसं/विकाना/शैवि/वृक्ष लागवड/२०१६ 1520**
**कालमर्यादीत** **दिनांक :- 27 MAY 2016**

**प्रति,**
**प्राचार्य/संचालक**
------------------------------
------------------------------
------------------------------
**(सर्व पदविका अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र संस्था, नागपूर जिल्हा)**

**विषय :- सन २०१६ मधील पावसाळयात दि. १ जुलै २०१६ या वनमहोत्सव कालावधीत दि.१ जुलै २०१६ या एकाच दिवशी राज्यात किमान २ कोटी वृक्ष लागवड करण्याबाबत.**

**संदर्भ :- १) उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नागपूर यांचे पत्र क्र. साववि/ना/योजना/१६-१७/८४, दि. ०५.०५.२०१६.**
**२) मा.सह सचिव(वने) महसुल व वन विभाग, मंत्रालय, म.रा.मुंबई यांचे शासन निर्णय क्र. साववि-२०१५/प्र.क्र.१३१/फ-११, दि. ३१ मार्च २०१६.**
**३) या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिसं/विकाना/शैवि/वृक्षलागवड/२०१६/१३९०, दि. १६.०५.२०१६.**
**४) उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नागपूर यांचे पत्र क्र. साववि/ना/योजना/१६-१७, दिनांक निरंक.**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपल्या संस्थेस/महाविद्यालय परिसरात ५० वृक्ष लावण्याबाबत उदिदष्ठ ठरवून देण्यांत आलेले आहे. त्याप्रमाणे या विभागांतर्गत नागपूर जिल्हयातील महाविद्यालयात वृक्ष लागवडीची उदिदष्ट पूर्ती करण्याचे दृष्टीने दिनांक १ जुलै २०१६ रोजी वृक्ष लागवडीकरीता आवश्यक ती माहिती सोबत जोडलेल्या शासन निर्णयातील **मुद्दा क्र. ४ व ५** नुसार प्रपत्रात **दिनांक २०/०५/२०१६ पूर्वी** सादर करण्याकरीता उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये आपणांस कळविण्यांत आलेले आहे. परंतु अद्यापही आपणाकडून माहिती प्राप्त न झाल्याने माहितीबाबत संबंधित कार्यालयाकडून या कार्यालयास वारंवार विचारणा करण्यांत येत आहे. यासंबंधात संदर्भिय क्र. ४ अन्वये मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली **दिनांक २६.०५.२०१६** रोजी वृक्ष लागवडीबाबत सभा घेण्यांत आली. आपणातर्फे दिलेल्या विहीत प्रपत्रामध्ये माहिती या कार्यालयास सादर न केल्याने माहिती पुरविणे शक्य झाले नाही. त्यामुळे मा. जिल्हाधिकारी यांनी नाराजी व्यक्त केलेली आहे.

सदर माहितीमध्ये वृक्ष लागवडीकरीता तयार करण्यांत आलेल्या **खड्डयांची संख्या, अक्षांश-रेखांश/लागवडीपूर्व फोटो या सर्व माहितीस प्रथम प्राधान्य देवून विहीत प्रपत्रात माहिती दिनांक ३१.०५.२०१६ पूर्वी सादर करण्यांत यावी.** सदरहू सभेमध्ये सन २०१६ मधील पावसाळयात दि. १ जुलै २०१६ या वनमहोत्व कालावधीत दि. १ जुलै २०१६ या एकाच दिवशी राज्यात किमान २ कोटी वृक्ष लागवड करण्याबाबत व ते यशस्विरित्या पार पडण्याबाबत सुचनेची प्रत यासोबत पाठविण्यांत येत आहे. सुचनेमध्ये नमूद केल्यानुसार योग्य ती कार्यवाही करुन माहिती त्वरीत सादर करण्यांत यावी जेणेकरुन सदर माहिती मा.संचालक, सामाजिक वनीकरण, म.रा.,मुंबई यांना सादर करणे सोईचे होईल.

**(गुलाबराव ठाकरे)**
**सहसंचालक,**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर

प्रत : १) मा.जिल्हाधिकारी, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीकरीता सविनय सादर.
२) उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नवीन प्रशासकीय इमारत क्र. २ विंग बी, ७ वा माळा, जिल्हा परिषद जवळ, सिव्हील लाईन्स, नागपूर-०१ यांना माहितीकरीता.
३) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण वि.का.नागपूर यांना सदरहू पत्र संकेतस्थळावर अपलोड करण्याकरीता.

## सन २०१६ मधील पावसाळयात दि. १ जुलै २०१६ या वनमहोत्सव कालावधीत दि.१ जुलै२०१६ या एकाच दिवशी राज्यात किमान २ कोटी वृक्ष लागवड करण्याबाबतची यशस्वितेबाबतची सुचना.

- सन 2016 मधील पावसाळयात दिनांक 1 जुलै 2016 ते 7 जुलै /2016 या वन महोत्सव कालावधीत दिनांक 1 जुलै /2016 हया दिवशी राज्यात किमान 2 कोटी वृक्ष लागवड करण्यात येणार आहे.
- त्या अनुषंगाने या कार्यक्रमातंर्गत वन व सामाजिक वनीकरण विभाग आणि महाराष्ट्र राज्य वन विकास महामंडळ यांच्या मार्फत कमीत कमी 1.50 कोटी वृक्ष लागवडीचे उदिष्ट ठेवले आहे. उर्वरित 50 लक्ष वृक्ष लागवड इतर विभागामार्फत करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.
- सदर कार्यक्रमासाठी लागणारा निधी अंमलबजावणी अधिकारी यांनी योजना / योजनेत्तर व तत्सम योजनेतुन उपलब्ध करून घ्यावयाचा आहे. त्याशिवाय शिल्लक राहिलेले उदिष्ट मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण करून त्याद्वारे दिलेले उदिष्ट पुर्ण करावयाचे आहे. जेथे शक्य आहे तेथे या कार्यक्रमातील CSR माध्यमातुन निधी उपलब्ध करण्यासाठी समिती कार्यवाही करेल.
- त्या अनुषंगाने विविध विभागांकडून सदरील वृक्षारोपणासंबधी माहिती विहीत प्रपत्रात वेळोवेळी पत्र, ई-मेल द्वारे मागविण्यात आली.
- 10 विभागांनी सदरील माहिती सामाजिक वनीकरण याकडे पाठवली आहे. पण सदरील माहिती ही अपुर्ण आहे.
- परिपुर्ण माहिती फक्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज युनिर्व्हसिटी यांनी पाठवली.
- तरी सर्व विभागांनी परिपुर्ण माहिती विहीत प्रपत्रात दिनांक 27/05/2016 पुर्वी सामाजिक वनीकरण विभाग, नागपूर यांना त्वरीत कळवावी. 31 मे 2016 नंतर सदरील माहिती ऑनलाईन समाविष्ट होवू शकणार नाही.
- तालुका
- रोपवन स्थळ निश्चिती, रोपांची संख्या, खड्डे पग्रती (संख्या)
- विभाग समन्वयक, नाव, मोबाईल नंबर, व ई-मेल
- स्थळ निहाय समन्वयक, नांव, मोबाईल नंबर
- प्रत्येक स्थळाचे अक्षांश/ रेखांश
- दिनांक 1 जुलै /2016 वृक्षारोपणाकरिता स्थानिक लोक प्रतिनिधी / मान्यवरांना आमंत्रित करणे.
- जुन चे शेवटचे आठवडयात व्यापक प्रमाणात प्रसिध्दी करावी.
- वृक्षारोपणाकरिता सवलतीचे दरात तालुका स्तरावरील वन / सामाजिक वनीकरण विभागाचे रोपवाटिकेतुन रोपे उपलब्ध करून देण्यात येतील.
- ग्रीडनिहाय प्रजातीची निश्चिती करावी.
- लागवडीचे 2 दिवसापुर्वी रोपवन स्थळावर रोपे वाहतुक पुर्ण होईल असे नियोजन करावे.
- वाहतुकीपुर्वी पाऊस झालेला नसल्यास पिशवीसह रोपे पाण्यात भिजवून वाहतुक करावी.
- सकाळी 6 ते सायंकाळी 6 पर्यंत रोपांची लागवड करणे व दर दोन तासांनी क्षेत्र समन्वयक रोपांच्या लागवडी बाबतची सद्यास्थिती त्यांच्या विभाग समन्वयकास कळवतील.
- दिनांक 1 जुलै /2016 रोजी वृक्षारोपनाचा अहवाल दर 2 तासांनी संबंधित यंत्रणा आपले जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना सादर करतील. तसेच जिल्हाधिकारी, जिल्हयाचा संकलित अहवाल शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र-1 मध्ये त्याच दिवशी ऑन लाईन पध्दतीने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या अधिपत्याखालील नियंत्रण कक्ष आणि सचिव (वने) यांना सादर करतील.
- वृक्षरोपनानंतर रोपांच्या जगण्याच्या यशस्वीतेबद्दल दर 3 महिण्यांनी अहवाल विभागीय आयुक्त (महसुल) यांच्या कडून सचिव (वने) आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरण पत्र -2 मध्ये सादर केला जाईल.
- वृक्ष जगण्याचे जबाबदारी व त्यासाठी लागणा-या उपाययोजना करणे संबंधित विभागाचे कार्य राहील.